# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०१.१०.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२५.०९.२०२६ ते ०१.१०.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०२.१०.२०२६ ते ०६.१०.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ०१ | दिनांक | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.४ | २२.४ | २०.२ | पाऊस (मिमी) | ३ | १ | ० | १ | ३ |
| ३०.४ | ३०.६ | ३१.० | ३१.६ | ३३.४ | ३२.० | ३१.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३२ | ३२ | ३५ | ३५ |
| २२.५ | २२.६ | २०.४ | २०.६ | २३.० | २१.४ | २१.२ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २३ | २३ | २३ | २३ |
| ८ | ५ | ५ | ८ | ८ | ८ | ८ | स. ढग स्थिती (आकाश) | ३ | २ | ३ | ३ | ३ |
| ८ | ५ | ८ | ५ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | |
| ८२ | ८३ | ८५ | ८८ | ८४ | ९६ | ९४ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९६ | ९३ | ९५ | ९५ | ९६ |
| ६३ | ६० | ५५ | ४३ | ५८ | ५८ | ५६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ९५ | ९२ | ९१ | ९१ | ९१ |
| ५.५ | ५.९ | ४.६ | ३.२ | २.५ | २.४ | २.१ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २ | ५ | ६ | १ | २ |
| प.नै. | प.नै. | नै. | आ. | ई. | ई. | प. | स. वाऱ्याची दिशा | वा. | ई. | पू.ई | ई. | प.नै. |
| नै. | नै. | वा. | नै. | उ.ई | पू. | नै. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ४३ | ८९०.९ | ६३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २, ३, ४, ५ व ६ ऑक्टोबर रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये व जिल्ह्यातील घाट भागात २, ३, ५ व ६ तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ६ ऑक्टोबर पर्यंत कमाल तापमान ३२.० ते ३५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९५ ते ९६%, दुपारची सापेक्ष आद्रता ९१ ते ९५% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १ ते ६ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान इशारा** | ०१.१०.२६ | कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी.<br>➢ खरीप पिकांना तसेच फळे व भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा<br>➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये शक्य असल्यास आच्छादनांचा वापर करावा |
| संदेश | | ❖ पक्व झालेल्या सोयाबीन, मूग, उडीद व इतर खरीप पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा |
| भात | फुलोरा ते दाणे भरणे | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेतातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवावी. भात पीक अधिकतम फुलोरा अवस्थेत असताना शेतात ५ ते १० सें.मी. पाण्याची पातळी राखावी. पाण्याची कमतरता असल्यास जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा.<br>➢ कडा करपा रोगाच्या प्रतीबांधासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन २ मिलि + कॉपर ऑक्सीक्लोराईड २० ग्रॅम प्रती पंप याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ दाणे भरण्याच्या अवस्थेत असणाऱ्या भात पिकावर लष्करी आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २.५ मिलि+ सायपेरमेथ्रीन ०.५ मिलि प्रती लीटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी |
| मका | दाणे भरणे | ➢ दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ ऊस पिकामध्ये पाण्याचा ताण पडत असल्यास २ टक्के युरिया किंवा २ टक्के म्युरेट ऑफ पोटॅशची फवारणी करावी.<br>➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उसाची खालची पक्व व वाळलेली पाने काढून ती सरीमध्ये आच्छादनासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | वापरावीत.<br>➢ पाण्याची बचत करण्यासाठी ऊस पिकाला एक आड एक सरी पद्धतीने सिंचन करावे.<br>➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री झाल्याशिवाय पूर्वहंगामी ऊस लागवडीची पूर्वतयारी सुरू करू नये.<br>➢ वाढलेली आर्द्रता आणि कमाल तापमानामुळे काही ठिकाणी ऊस पिकावर लोकरी माव्याचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. प्रादुर्भाव दिसताच इमिडाक्लोप्रिड १७.८% एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ कमाल तापमानामध्ये झालेली वाढ व वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी शेंगेवरील करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी टेब्युकोनॅझोल १०% + सल्फर६५% डब्ल्यु. जी. या बुरशीनाशकाची २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ शेंगा भरण्याच्या अवस्थेत ००.००.५० या विद्राव्य खताची १० ग्रॅम प्रती लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी.<br>➢ पक्क झालेल्या सोयाबीन पिकाची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा |
| मूग | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्क झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्क झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| टोमॅटो | फळधारणा | ➢ जोरदार वाऱ्यामुळे टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो झाडांनासहाय्याने रोपांना काठीच्या किंवा बांबूच्या/ आधार द्यावा<br>➢ काढणी केलेल्या टोमॅटो फळांची त्वरित सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी |
| पशुधन | वाढीची | ➢ जंत निर्मुलन झालेले असल्यास लाळ खुरकत या रोगाच्या प्रतिबंधासाठी तज्ञ पशु वैद्यकांच्या सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>➢ ऑक्टोबर हीट असल्याने सकाळच्या वेळी जनावरे चारावयास सोडावे, दुपारच्या वेळी उन्हामध्ये जनावरे चारावयास सोडणे टाळावे<br>➢ जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्यास जनावरांसाठी चाऱ्याचे नियोजन करण्याकरिता चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी.<br>➢ पाण्याची उपलब्धता असल्यास संकरीत नेपीयर गवतची लागवड करावी.<br>➢ चाऱ्यासाठीचा मका उपलब्ध असल्यास मुरघास तयार करावा |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

ठिकाण : कोल्हापूर
दि. : ०१.१०.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर